**प्रस्तावना**

**विषय :- मालमत्ता कर न भरणाऱ्या जप्त केलेल्या मालमत्तांचा रुपये १/- नाममात्र दराने मनपाच्या ताब्यात घेणे करिता प्रस्ताव सादर करणे बाबत**

संदर्भ :- १) प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यालयाकडील जप्त करण्यात आलेल्या मिळकतीच्या यादया
२) दिनांक १२/०८/२०२२ रोजीच्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केलेली जाहिर सूचना
३) जा.क्र./भिनिशमनपा/करमुल्यांकन ३८८२/२०२२, दि. ३०/०६/२०२२ रोजीचा आदेश
४) जा.क्र./भिनिशमनपा/प्र.स.क्र.१/४५५, दि. ११/११/२०२२ अन्वये प्रसिध्द केलेली जाहिर सूचना
५) जा.क्र./भिनिशमनपा/प्र.स.क्र.२/६३२, दि. १४/११/२०२२ अन्वये प्रसिध्द केलेली जाहिर सूचना
६) जा.क्र./भिनिशमनपा/प्र.स.क्र.३/९२३, दि. १५/११/२०२२ अन्वये प्रसिध्द केलेली जाहिर सूचना
७) जा.क्र./भिनिशमनपा/प्र.स.क्र.४/३२७, दि.१४/११/२०२२ अन्वये प्रसिध्द केलेली जाहिर सूचना
८) जा.क्र./भिनिशमनपा/प्र.स.क्र.५/३१८, दि.१४/११/२०२२ अन्वये प्रसिध्द केलेली जाहिर सूचना
९) प्रभाग समिती क्र. १ ते ५ यांचेकडून प्राप्त झालेल्य अद्यावत याद्या.

सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षामध्ये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रातील एकूण ५५ मिळकती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ ची अनुसूची "ड", प्रकरण ८ कराधान नियम ४२ अन्वये अधिपत्र बजावून अटकावणी करण्यात आलेल्या होत्या. त्यानंतर वरील संदर्भ क्र. २ नुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिर सूचना प्रसिध्द करुन थकीत मालमत्ताधारक यांनी मालमत्ता कर भरणे करीता अंतिम संधी देण्यात आलेली होती.

सदरचे अधिपत्र बजावल्या नंतरही व संधी देऊन ही संबंधीत मालमत्ताधारक यांनी त्यांचे मालकीच्या असलेल्या मिळकतीचा मालमत्ता कर न भरल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ ची अनुसूची "ड", प्रकरण ८ कराधान नियम ४५ (१) अन्वये सदर ५५ मिळकतीचा थकीत मालमत्ता कर न भरल्याने संदर्भ क्र. ३ नुसार प्रभाग समिती क्र. १ ते ५ यांना आदेश देऊन जप्त करण्यात आलेल्या मिळकतीचे मुल्यांकन करुन लिलावाची प्रक्रिया करणे करीता आदेशीत करण्यात आलेले होते. त्यानुसार प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यालयाकडून वरील संदर्भ क्र. ४ ते ८ नुसार जाहिर लिलाव सूचना प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार खालील परिशिष्टात नमुद करण्यात आलेल्या मिळकतीचा लिलाव करण्यात आलेला आहे.

## “जप्त करण्यात आलेल्या मिळकतीची यादी”

### प्रभाग समिती क्र.1

| अ.क्र. | मिळकत क्रमांक | विभाग | मालमत्ताधारकांचे नाव | थकबाकीसह रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 437/0 | चाविंद्रा,भिवंडी | सनोबर मुजम्मील पटेल | 8,13,106/- |
| 2 | 722/0 | चाविंद्रा,भिवंडी | शबाना अली हबीबुल्ला अन्सारी | 3,12,484/- |
| 3 | 2026/0 | नागांव 2 | मुश्ताक अह.हाजी अशरत अली | 2,61,539/- |
| 4 | 1041/0 | निजामपुरा 4 था | मुश्ताक अह.अब्दुल कादिर पटेल | 2,69,528/- |
| 5 | 3192/0 | नागांव 2 | मो.सलीम बशरतुल्ला अन्सारी | 16,33,474/- |
| 6 | 3338/0 | नागांव 2 | अमिर हसन अन्सारी | 13,73,132/- |
| 7 | 248/0 | नागांव 2 | अंकुश महादू पाटील | 5,46,307/- |
| 8 | 741/0 | नागांव 2 | नफिस अहमद अनिस अहमद | 5,78,059/- |

### प्रभाग समिती क्र. 2

| अ. क्र. | मिळकत क्रमांक | विभाग | मालमत्ताधारकांचे नाव | थकबाकीसह रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 1161/0 | नागांव 1 | मुकेशभाई काशि भाई पटेल | 15,79,196/- |
| 2 | 1424/1 | | हाजी अहमद इलाहीबक्ष मोमीन | 5,12,432/- |
| 3 | 2439/0 | | मोहम्मद आरिफ इसरार अहमद शेख | 1,97,779/- |
| 4 | 84/0 | नविन कणेरी | बिस्मील्लाह खान जोरावर खान | 2,86,049/- |
| 5 | 668/0 | नविन कणेरी | मेहमूद अलम इरफुद्दीन शेख | 11,30,184/- |
| 6 | 554/0 | टेमघर 2 | शंकर लच्छय्या मि ठापेल्ली | 4,66,348/- |
| 7 | 483/2/बी | टेमघर 2 | मोह. अन्वर असगर अली अन्सारी फातिमा असगर अली अन्सारी | 3,78,219/- |

### प्रभाग समिती क्र.3

| अ.क्र. | मिळकत क्रमांक | विभाग | मालमत्ताधारकांचे नाव | थकबाकीसह रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 221/0 | कामतघर | कलमुद्दीन समसुद्दीन शेख व इतर | 8,32,044/- |
| 2 | 1650/0 | नविन कणेरी | नरसय्या यंमुलु | 38,00,000/- |
| 3 | 1140/1 | नविन कणेरी | प्रभाकर नारायण आडेप | 2,46,228/- |
| 4 | 1140/2 | नविन कणेरी | रमेश नारायण आडेप | 1,27,713/- |

**प्रभाग समिती क्र.4**

| अ.क्र. | मिळकत क्रमांक | विभाग | मालमत्ताधारकांचे नाव | थकबाकीसह रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 1280/36 | नारपोली 2 | सत्यभामा मुरली सोनी | 4,31,314/- |
| 2 | 1123/0 | नारपोली 2 | श्री.शंकर भुमय्या कुरे | 1,90,066/- |
| 3 | 984/0 | नारपोली 2 | शौकत अली मोमीन मोह/ सुफी खान | 3,48,603/- |
| 4 | 1108/0 | नविन गौरीपाडा | इकबाल अहहाजी दर्गाही | 3,57,778/- |
| 5 | 1581/0 | नारपोली 2 | अशोक लक्ष्मण भोईर | 4,96,786/- |
| 6 | 1346/0 | नारपोली 2 | किसन बाळू टावरे | 4,06,165/- |
| 7 | 1414/0 | नारपोली 2 | हरिश्चंद्र जयराम टावरे | 8,33,290/- |
| 8 | 317/0 | नारपोली 2 | सईदबानो महं.इब्राहीम | 3,41,238/- |
| 9 | 1565/0 | नारपोली 1 | उजेर अहफिरोज/साहेब अहमद शेख रशिद/अहमद फैय्याज अहमद खान इलियास खान | 10,89,919/- |
| 10 | 711/0 | नारपोली 2 | शारनेब जैस मोहम्मद खान व इतर | 5,77,319/- |

## प्रभाग समिती क्र.5

| अ.क्र. | मिळकत क्रमांक | विभाग | मालमत्ताधारकांचे नाव | थकबाकीसह रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 22/2 | प्रभु आळी | सुनिल शंकर जाधव | 83,345/- |
| 2 | 22/3 | प्रभु आळी | संजय भरलाल जैन | 75,705/- |
| 3 | 22/4 | प्रभु आळी | जगदिश वल्लभदास शहा | 83,733/- |
| 4 | 22/5 | प्रभु आळी | किरण चंदुलाला जैन | 75,961/- |
| 5 | 22/6 | प्रभु आळी | सु धि र चंदुलाल जैन | 83,733/- |
| 6 | 22/7 | प्रभु आळी | राकेश भवरलाल जैन | 83,697/- |
| 7 | 22/8 | प्रभु आळी | कच्छप जगदीश शहा | 75,887/- |
| 8 | 22/9 | प्रभु आळी | अशोक शंकर जाधव | 74,560/- |
| 9 | 126/0 | भिवंडी बौध्दवाडा | इकबाल अहमद मोमीन | 2,03,310/- |

उपरोक्त मिळकतीची जप्ती व लिलाव करण्यात आलेला असून त्यापैकी काही मिळकतधारक यांनी लिलाव दरम्यान त्यांच्या मिळकतीचा कर भरलेला आहे. तसेच उर्वरीत काही मिळकतीचा लिलाव करण्यात आल्यानंतरही संबंधीत मिळकतधारक यांनी मालमत्ता कर भरलेला नसल्याने सदरच्या मिळकती रु. १/-

नाममात्र दराने मनपाचे ताब्यात घेणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि प्रकरण ८ कराधान नियम ४७ (७) विक्रीसाठी काढलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या बाबतीत महानगरपालिकेच्या वतीने आयुक्ताने नाममात्र बोली बोलणे हे कायदेशीर असेल परंतु अशा रीतीने बोली बोलण्यासाठी मा. स्थायी समितीची पूर्वमान्यता मिळवण्यात आली पाहिजे अशी तरतुद आहे. तथापी सद्या शासनाचे दिनांक १० जून २०२२ च्या आदेशान्वये मा. आयुक्त यांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेले असल्याने मा. महासभेचे सर्व अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना प्राप्त झालेले आहे. या अधिकार कक्षेनुसार

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४७ (७) प्रमाणे मनपाचे नांव लावून घेऊन आकारणी सदरी मनपा मालक म्हणून नाव लावणे व मिळकतधारक यांचे भाडेधारक म्हणून नाव घोषित करणे.
२) मनपाचे नांव लावल्यानंतर सदर मालमत्तांच्या नोंदी मालमत्ता विभागकडे वर्ग करणे.
३) मालमत्ता विभागाने यानंतरचे मासिकभाडे निश्चीत करुन संबंधितास भाडे भरणे बाबत कळविणे.
४) मालमत्ता विभागाने यानंतरचा कर + दरमहा मासिक भाडया प्रमाणे संबंधीताकडून रक्कम वसुली करणे.

उपरोक्त प्रस्तावास मा. प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांच्या धोरणात्मक निर्णयासाठी तसेच उपरोक्त मिळकतधारकांनी सदरची कार्यवाही पूर्ण होणेच्या आत मालमत्ता कराची संपूर्ण रक्कम भरल्यास संबंधीत मिळकतधारक यांची नांवे वगळण्यास मुभा असावी. तरी मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी ही विनंती. सोबत : वरील ३८ मालमत्तांचा हस्तांतरण तक्ता मान्यतेस्तव सादर.

दिनांक १६/०२/२३

**प्रशासकीय ठराव क्र.** ..८६

सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षामध्ये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रातील एकूण ५५ मिळकती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ ची अनुसूची "ड" प्रकरण ८ कराधान नियम ४२ अन्वये अधिपत्र बजावून अटकावणी करण्यात आलेल्या होत्या. त्यानंतर वरील संदर्भ क्र. २ नुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिर सूचना प्रसिध्द करुन थकीत मालमत्ताधारक यांनी मालमत्ता कर भरणे करीता अंतिम संधी देण्यात आलेली होती.

सदरचे अधिपत्र बजावल्या नंतरही व संधी देऊन ही संबंधीत मालमत्ताधारक यांनी त्यांचे मालकीच्या असलेल्या मिळकतीचा मालमत्ता कर न भरल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ ची अनुसूची "ड", प्रकरण ८ कराधान नियम ४५ (१) अन्वये सदर ५५ मिळकतीचा थकीत मालमत्ता कर न भरल्याने उपरोक्त मिळकतीची जप्ती व लिलाव करण्यात आलेला असून त्यापैकी काही मिळकतधारक यांनी लिलाव दरम्यान त्यांच्या मिळकतीचा कर भरलेला आहे. तसेच उर्वरीत काही मिळकतीचा लिलाव करण्यात आल्यानंतरही संबंधीत मिळकतधारक यांनी मालमत्ता कर भरलेला नसल्याने सदरच्या मिळकती रु. १/-

नाममात्र दराने मनपाचे ताब्यात घेणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि प्रकरण ८ कराधान नियम ४७ (७) विक्रीसाठी काढलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या बाबतीत महानगरपालिकेच्या वतीने आयुक्ताने नाममात्र बोली बोलणे हे कायदेशीर असेल परंतु अशा रीतीने बोली बोलण्यासाठी मा. स्थायी समितीची पूर्वमान्यता मिळवण्यात आली पाहिजे अशी तरतुद आहे. तथापी सद्या शासनाचे दिनांक १० जून २०२२ च्या आदेशान्वये मा. आयुक्त यांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेले असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १(ब) च्या तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार (मा. महासभा व मा. स्थायी समितीचे अधिकार) मी विजयकुमार म्हसाळ , प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४७ (७) प्रमाणे मनपाचे नांव लावून घेऊन आकारणी सदरी मनपा मालक म्हणून नाव लावणे व मिळकतधारक यांचे भाडेधारक म्हणून नाव घोषित करणे.
२) मनपाचे नांव लावल्यानंतर सदर मालमत्तांच्या नोंदी मालमत्ता विभागकडे वर्ग करणे.
३) मालमत्ता विभागाने यानंतरचे मासिकभाडे निश्चीत करुन संबंधितास भाडे भरणे बाबत कळविणे.
४) मालमत्ता विभागाने यानंतरचा कर + दरमहा मासिक भाडया प्रमाणे संबंधीताकडून रक्कम वसुली करणे.

उपरोक्त मिळकतधारकांनी सदरची कार्यवाही पूर्ण होणेच्या आत मालमत्ता कराची संपूर्ण रक्कम भरल्यास संबंधीत मिळकतधारक यांची नांवे वगळण्यास तसेच सोबत : वरील ३८ मालमत्तांचा हस्तांतरण तक्त्यास तसेच चालू आर्थिक वर्षामधील म्हणजे सन २०२२-२०२३ मधील प्रभाग समिती क्र. १ ते ५ अंतर्गत जप्त/अटकावणी करण्यात आलेल्या मालमत्तांचे मुल्यांकन करुन सदर मिळकतीची लिलावाची प्रक्रिया पूर्ण करुन मालमत्ता कराची संपूर्ण रक्कम न भरल्यास मनपा दप्तरी नाममात्र बोलीने मनपाच्या ताब्यात घेणे करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ७ कलम ७३ नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**